दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com vadalvartanews@gmail.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● बुधवार १९ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३११ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# कुणी मारुन टाकीन म्हणतो, गोळ्या घालीन म्हणतो, मनोज जरांगे पाटलांच्या विधानाने खळबळ

## मराठा आरक्षणावर आक्रमक भूमिका

कॅबिनेट बैठक आहे का नाही माहित नाही. प्रत्येक वेळी शंका घेऊ नये. आपली तारीख 13 आहे. समाजाला दिलेला शब्द सरकारने पाळावी. ओबीसी मराठा वादाची काय संबंध? ओबीसी आरक्षण असून ते रडत आहेl. आम्हाला तर आरक्षण नाही. त्यामुळे चौपट लढतील. आमचे लोक आता आपसातील भांडण मिटवून एक होतील. मिळू नये म्हणून एक झाली. आम्हाला मिळावं म्हणून एक होणार आहे. मराठ्यांच्या नेत्यांना उघडे डोळे घेऊन बघता का? मदत करणार नाही आमदार- खासदारांना उघडे पडणार आहे, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.



मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. जालन्यातील अंतरवली सराटी या ठिकाणी मनोज जरांगे पाटलांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी मनातील भीती त्यांनी बोलून दाखवली. अंतरवलीमधून मला हलू देत नाहीत. मी तिथे आंदोलन करतो. कुणी मला मारून टाकीन म्हणतो. कुणी गोळ्या घालीन म्हणतो... सरकार, पोलीस मराठ्यांच्या विरोधात आहे. सरकार आणि पोलिसांना वाटतं की घातपात झालं पाहिजे. दुसऱ्याचं झालं तर तातडीने कारवाई करून संरक्षण देतं. मात्र आम्हाला मारून टाकू द्या. आमच्याकडे लक्ष देत नाही. पण मी भीत नाही. समोर ये.. कचका दाखवतो. आमचे लई हल आहे. मराठ्यांचा वेगळं हाल आहेत, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

भुजबळांच्या भूमिकेवर प्रतिक्रिया

छगन भुजबळ याला मी टार्गेट केलं काही करेल. तुम्हाला अस म्हणायचं का आम्ही एकमेकांना भाऊ म्हणू नये? यासाठी आंदोलन उभे केले का? मी धनगर समाजाला आरक्षण देईल म्हणतो. तरी लोक आमच्या मागे नाही. मी सरकारला अंगावर घ्यायचं ठरवलं अन् तुम्ही लोकांचं एकूण खोटं लढत आहे. धनगर बांधवांच्या अडून हे लढत आहे. मी मात्र ओबीसीमधून घेतल्याशिवाय थांबणार नाही, असंही मनोज जरांगे म्हणाले. मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण मिळावं, यासाठी प्रयत्न करा. इकडे मराठा आमदार खासदार येतंय. पत्र द्यायला लागले आहे. महाराष्ट्र समाज बघत आहे. जे येत नाही ते विरोधी आहे का? असा प्रश्न पडतो. या एकजुटीचा समाजाला फायदा होईल. अधिवेशन आरक्षणासाठी गाजवत आहे. कोण पत्र घेऊन येत नाही त्यावर लक्ष आहे. आता भागलं मात्र अस वागला. तर पुढची तयारी मराठ्यांनी केली आहे, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## वंचित बहुजन आघाडीचे राजू कांबळे यांचा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या गटात जाहीर प्रवेश



बीड प्रतिनिधी वंचित बहुजन आघाडीचे बार्शी नाका परिसरातील युवक नेते राजू कांबळे यांनी जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या गटात जाहीर प्रवेश केला यावेळी त्यांच्या समवेत मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित असल्याचे पहावयास मिळाले. राजू कांबळेहे अनेक वर्षापासून भारिप बहुजन ते वंचित बहुजन आघाडी असा त्यांचा राजकीय प्रवास होता त्यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या गटात जाहीर प्रवेश केला आहे त्यांच्यासमवेत आणि कार्यकर्त्यांनी देखील जाहीर प्रवेश केला आहे. माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या कार्य कुशलतेवर विश्वास ठेवून हा पक्षप्रवेश केल्याचे त्यांनी सांगितले आहे यावेळी त्यांच्या समवेत मोठा मित्रपरिवार उपस्थित होता

## शक्तीपीठ महामार्ग ;राज्यात आंदोलन कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी मतदारसंघातील शेतकऱ्यांची शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याची मागणी

**प्रतिनिधी/बीड :-**

राज्यातील १२ हजार ५८९ शेतकऱ्यांचे होणार नुकसान बीड शक्तीपीठ महामार्गाबाबत आज राज्यभरात शेतकऱ्यांनी आंदोलन केले. राज्याचे कृषिमंत्री तथा बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या बीड जिल्ह्यात आज शेतकऱ्यांनी आंदोलन करत सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली. शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन आज उपजिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. हा शक्तीपीठ महामार्ग महाराष्ट्रातील बारा जिल्ह्यातून जाणार आहे. राज्यातील सुमारे १२ हजार ५८९ नुकसान होणार आहे. बीडच्या परळी ७०० शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. राज्यातील २७ हजार एकर जमीन या महामार्गात जाणार आहे मराठवाड्यातील बाधित शेतजमीन ही अनेक सिंचन कालवे , नद्या, विहीरी, तलावाअंतर्गत कायमस्वरूपी बागायती आहे व सुपीक आहे व त्यामुळे हजारो कुटुंबाचा उदरनिर्वाह या बाधित जमिनीवरच अवलंबून आहे व या महामार्गामुळे ही सर्व नैसर्गिक किंवा कृत्रिम साधन संपत्ती नष्ट होणारी आहे व महामार्ग सोडून राहिलेली उर्वरित हजारो हेक्टर जमीन ही पाण्याअभावी नापीक किंवा दुष्काळी होणारी आहे आज भारतासारख्या देशामध्ये बेरोजगारीचे प्रमाण बरेच आहे व आता या महामार्गामुळे शेतीवर जी रोजंदारी अवलंबून आहे त्या लोकांची पण जीवन यात्रा अवघड होऊन बसणार आहे. ज्यांचा पारंपारिक शेती व्यवसाय आहे त्यांना किंवा त्यांच्या मुलांना बाहेरील जगाचे ज्ञान नसल्याकारणाने ते इतर कोणत्याही व्यवसाया त प्राविण्याने काम करू शकत नाहीत व मावेजा स्वरूपात मिळालेली रक्कम नुकसानीत जाणारी आहे. यामुळे बाधित शेतकऱ्यांवर दुहेरी नुकसान ओढवणार आहे व अशा घटना झालेल्या आहेत. या महामार्गामध्ये बरेच शेतकरी भूमिहीन होऊन त्यांना स्थलांतरित व्हावं लागणार आहे त्यांचाही खूप मोठा प्रश्न आहे. आज वृक्षतोड झाल्याकारणाने जागतिक तापमानात खूप भयंकर 'वाढ झालेली असताना या महामार्गात कोटीच्या घरात वृक्षतोड होणारी आहे त्यामुळे पर्यावरणाचाही ह्रास होणार आहे. या महामार्गात असलेले विविध जिल्हे त्यामध्ये याच शेतीवर अवलंबून उस किंवा इतर उद्योग बंद पडण्याची शक्यता आहे. आणखी बऱ्याच गोष्टी आहेत की त्यामुळे बाधित शेतकरी, शेतीवर अवलंबून असणारा रोजगार व पर्यावरण या सर्व समस्यांना डावलून आज नागपूर-रत्नागिरी हा महामार्ग समांतर असताना रस्त्याची खरेच गरज काय आहे ? असा प्रश्न मराठवाड्यातील सामान्य जनतेला पडलेला आहे. आज अंबाजोगाई शहरातील उप जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे, निदर्शने करून उपजिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे यावेळी अखिल भारतीय किसान सभा बीड जिल्हाअध्यक्ष कॉ अजय बुरांडे, ॲड शिंदे, रवींद्र देवरवाडे यांच्यासह परळी मतदारसंघातील गावचे बाधित शेतकरी सहभागी झाले होते.



## सामाजिक कार्यकर्ते राजेश दिवटे यांचे कार्य प्रेरणादायी आहे-वृक्षमित्र अरुण पवार



**बीड/प्रतिनिधी**

यशवंती आधार सामजिक संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते श्री. राजेश बाबासाहेब दिवटे यांच्या वाढदिवसानिमित्त शंभर झाडाची लागवड सिद्धबेट आळंदी या ठिकाणी करण्यात आली यावेळी वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावण्यात आली यामध्ये चिंच,जांभळ,आंबा, आवळा, कारंजी,लिंब ,वड,पिंपळ बदाम इत्यादी झाडांची प्रामुख्याने लागवड करण्यात आली या वेळी प्रमुख पाहुणे वृक्षमित्र अरुण पवार साहेब म्हणाले यशवंती आधार सामाजिक संस्थेचे अध्यक्ष राजेश दिवटे यांनी राबवलेला वृक्ष लागवडीचा उपक्रम खरच सर्वांसाठी प्रेरणादायी आहे वाढत्या उन्हाच्या चटक्याने आज अनेकांचे जीव गेले आहेत भविष्यत ही परिस्थिती अजून गंभीर होईल निसर्गाने आपल्याला बरेच काही शिकवलं आहे. काळाचे पाऊल ओळखून सर्वांनी वेळी सावध होऊन जास्तीत जास्त वृक्ष लागवड आपण केली पाहिजे. "झाडे लावा झाडे जगवा" या संस्थेच्या प्रेरणाचा उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.


या वेळी गायनाचार्य नारायण महाराज यमगर, विषुभाऊ कुऱ्हाडे,संतोष सुरवसे, डॉ. सुनील वाघमारे, विठ्ठल शिंदे, दिनेश कुऱ्हाडे,किशोर काळदाते, जनार्दन पितळे, बडगुजर साहेब, आदी मान्यवर उपस्थित होते.

## लोकशाही दिनात एक तक्रार अर्ज दाखल

बीड, दि. 18 :शासन आदेशान्वये महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो.

प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याचे चौथ्या सोमवारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिस-या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. दि. 18 जून 2024 रोजी सकाळी 11.00 ते 12.00 वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या महिला लोकशाही दिनात 1 तक्रार अर्ज दाखल झाला असून एक तक्रार अर्ज निकाली निघाला असल्याचे महिला व बालविकास अधिकारी यांनी कळविले आहे.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाने दिले ३१४९ उद्योजकांना २२७ कोटी चे आर्थिक पाठबळ - जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर.




## महामंडळाच्या माध्यमातून तरूणाची यशस्वी उद्योजक होण्याच्या दिशेने वाटचाल

**परळी/प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य अभियान योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात 3149 तरुणांना 227 कोटी 57 लाख चे कर्जवाटप झाले आहे. तसेच या नवउद्योजकांना 21 कोटी 3 लाख रुपयेचा व्याज परतावा त्यांच्या खात्यावर जमा झाला आहे. नियमित हप्ता भरणाऱ्यांना महामंडळाकडून व्याज परतावा दिला जातो, अशी माहिती अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर यांनी दिली. महामंडळाकडून 9654 तरुणांना पात्रता प्रमाणपत्र मिळाले आहे. शासनाने आर्थिक दुर्बल घटकातील बेरोजगार युवकांना स्वयंरोजगारासाठी महामंडळाच्या माध्यमातून वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना आणि गट कर्ज व्याज परतावा योजना राबवल्या जातात. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून कर्ज योजनेमार्फत उद्योग व्यवसाय उभारण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अर्थसहाय्यामुळे बीड जिल्हयात महामंडळाच्या माध्यमातून तरुणांना स्वप्नांना साकार करण्याचे नवे बळ मिळाले आहे नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्यांनाही नियमित व्याज परतावा येत आहे. तरुणांनी योजनेचा लाभ घ्यावा काही अडचणी असल्यास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क करावा,असे आवाहन महामंडळाचे जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर यांनी केले आहे.

कविता

## पाण्याच्या थेंबाला

आई एकटी झोपली अंधार खोलीत,
मुलगा ऍश करतो एशीच्या खोलीत,
प्राणा परी जपली रे रक्ताच्या थेंबाला,
असा का करतो तू पाण्याच्या थेंबाला!१!

लहान असतांना केली तुझी तीने सेवा,
त्यामुळे आज तू खातोस चोखा मेवा,
नको त्रास देऊ आपल्या जन्मदातीला,
असा का करतो तू पाण्याच्या थेंबाला!२!

रात्र रात्र जागून पाजीला तुला दूध,
विसरला का तू रे आपला सुध बुध,
विसरू नको रे तिच्या अमाप प्रेमाला,
असा का करतो तू पाण्याच्या थेंबाला!३!

आई म्हणे माझं सोन्या अन् माझं दादा,
जीवन भर साथ देईन राहिला रं वादा ,
बाळ माझं गुणाचा मिरवते सर्व जगाला,
असा का करतो तू पाण्याच्या थेंबाला!४!

तू चुकला जरी एका क्षणात करते माफ,
तुझ्या आयुष्यातील वेदना करते साफ,
संकटात उभी असेल प्रथम मदतीला,
असा का करतो तू पाण्याच्या थेंबाला!५!

रिकाम्या पोटी आठवली सदैव ती आई,
तुझ्याच साठी अहोरात्र झटली ती माई,
कबाड़ कष्ट करुनी सिद्ध केलं जगण्याला,
असा का करतो तू पाण्याच्या थेंबाला!६!

नको ठेऊ रे तिला ह्या वयात वृद्धाश्रमात,
घरी दोन घास खाऊन राहील आरामात,
आईविना थोर नाही कर अर्पण पुष्पमाला,
असा का करतो तू पाण्याच्या थेंबाला!७!
तीच तुझ्या आयुष्याची पहिली शाळा,
असा का करतो तू पाण्याच्या थेंबाला!८!

**अजय शिवराम गणविर**
**बृ.मनपा शिक्षक**

# खा.सोनवणेंचा मॅरेथॉन बैठकांचा धडाका प्रशासनावर बसवली पकड

## डिसेंबरपर्यंत अहिल्यानगर ते बीड रेल्वे ट्रायल रन पुर्ण होणार : खा.बजरंग सोनवणेंची माहिती

**बीड/प्रतिनिधी:** लोकसभा निवडणूकीत विजय मिळल्यानंतर सत्काराचे हार-तुरे घेत न बसता खा.बजरंग सोनवणे ताकतीने कामाला लागले आहे. दि.१८ जून रोजी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विभागांच्या मॅरेथॅान बैठका घेतल्या. यावेळी जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा विषय असलेल्या रेल्वेबाबतीत आढावा घेतला. डिसेंबर अखेर अहिल्यानगर ते बीड रेल्वे ट्रायल रन पुर्ण होत असल्याची माहिती दिली. तर एक वर्षात परळीपर्यंत रेल्वेचे काम पुर्ण करा, अशा सुचनाही अधिकाऱ्यांना दिल्या. मॅरेथॅान बैठकातून त्यांनी जिल्हा प्रशासनावर आपली चांगलीच पकड बसविली आहे. खासदार बजरंग सोनवणे यांनी दि.१८ जून रोजी विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी मॅरेथॅान बैठकां घेतल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या हॉलमध्ये झालेल्या बैठकीला आ.संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, लीड बँकेचे सर्व अधिकारी, विविध बँकांचे प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. जिल्हा परिषद प्रशासनाकडे असलेल्या जलजीवन मिशन योजनेला मरगळ आलेली असून काही ठिकाणी अर्धवट कामे करून पैसे उचलले जात असल्याचे समोर येत आहे. यामुळे अधिकाऱ्यांनी कामे दर्जेदार करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत. गावात पाणी देणे हे पुण्याचे काम असून सदरील कामे करताना सामान्य माणसाला पाण्यासाठी फिरण्याची वेळ येऊ येणार नाही अशा सूचना केल्या. अशा काही तक्रारी आल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही, असे म्हणत अर्धवट कामांची पंधरा दिवसात प्रगती दाखविण्याच्या सुचना त्यांनी दिल्या. शिवाय जलजीवन योजनेसाठी लागणारा निधी आणण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करू, पैशाची काळजी करू नका, असेही म्हटले. याच बरोबर




राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना, सर्व शिक्षा अभियान आणि बचत गटांचाही आढावा घेण्यात आला. बचत गटाच्या माध्यमातुन केंद्र शासकीय योजना अधिकाधिक कुटुंबापर्यंत पोचवणार, असा शब्दही खा.सोनवणे यांनी दिला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी वासूदेव सोळंके, डॉ.उल्हास गुंडाळ, शिक्षणाधिकारी फुलारी, शिंदे यांची उपस्थिती होती. यानंतर रेल्वे अधिकाऱ्यांच्या बैठकीस आहिल्यानगर येथील रेल्वे विभागाचे उपमुख्य अभियंता श्री. आर.के.यादव व रेल्वेचे सर्व अधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी खा.सोनवणे यांनी आढावा घेत जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या रेल्वे प्रश्नावर चर्चा केली. यावेळी डिसेंबरपर्यंत अहिल्यानगर ते बीड रेल्वे ट्रायल रन पुर्ण होणार असे त्यांनी ठामपणे सांगितले. याच बरोबर बीड- परळी रेल्वे मार्गाचे काम एक वर्षाच्या आत पुर्ण करा, रेल्वेचे कार्यालय बीड येथे आणन्यासाठी करावयाच्या योजनाची माहिती घेतली. त्यासाठी जे जे करता येईल ते करा, भुसंपादनाचे विषय तातडीत मार्गी लावा अशी तंबीही अधिकाऱ्यांना दिली. यावेळी लीड बँकेची देखील बैठक घेण्यात आली. जिल्ह्यात शेतकऱ्यांना वेळेत पीककर्ज द्या, कोणत्याही शेतकऱ्याची अडवणूक झाल्याची तक्रार आली किंवा त्यात तथ्य आढळले तर गाठ माझ्याशी आहे, असा इशाराही त्यांनी दिला. जिल्ह्यातील मराठा समाजातील तरूणांना उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी अण्णासाहेब पाटील महामंडळाकडून कर्ज द्या, त्यांना स्वत:च्या पायावर उभा राहू द्या, असेही खा.सोनवणे म्हणाले. खा.सोनवणे म्हणाले, चर्चा नको, काम दाखवा.. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या बैठकीत रस्त्याचे कामे संथगतीने सुरू आहेत. बैठकीत पालखी मार्ग असलेल्या पैठण-पंढरपूर मार्गाच्या विषयाला खा.सोनवणे यांनी हात घातला. या मार्गातील पाटोदा तालुक्यातील मळेकरवाडी घाटाचे काम अनेक वर्षापासुन रखडले होते. सदरील काम तातडीने सुरू करा, असे त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. यानंतर एक तासात सदरील काम सुरू करण्यात आले. यावेळी कार्यकारी अभियंता अशोक इंगळे, सुर्यकांत गलांडे, सुनिता वनवे, प्रविण सुमंत, यांची उपस्थिती होती. रखडलेली कामे सुरू करा जिल्ह्यात राष्ट्रीय महार्गाची बहूतेक कामे रखडली आहेत. यात पैठण-पंढरपूर, खरवंडी- नवगण राजूरी, अहमदपूर- चुंबळी, परतूर-बार्शी, लातूर-पाथरी, अहमदनगर- बीड-परळी, गंगाखेड, खरवंडी कासार-पाडळसिंगी या रस्त्यांचा समावेश आहे. सदरील कामे येत्या सहा महिन्यात पुर्ण करा, जिल्ह्यातील नागरिकांच्या जिवीताशी खेळू नका, अशा सुचनाही खा.सोनवणे यांनी दिल्या.केज शहरातुन जाणाऱ्या दोन्ही राष्ट्रीय महामार्गाच्या थांबलेल्या कामांची गती वाढवुन गतीने कामे पुर्ण करणार आणि धारुर घाटातील रुंदीकरणाचे तसेंच उर्वरित काम वेगाने पूर्ण करुन घेणार, असेही ते म्हणाले

# खरीप-२०२४ साठी पीक विमा भरण्यास सुरुवात, एक रुपयात भरला जाणार पीकविमा - धनंजय मुंडे

## शेतकऱ्यांनी आपला खरीपाचा पीकविमा १५ जुलै पूर्वी भरून घ्यावा - कृषिमंत्र्यांचे आवाहन

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

मुंबई (दि. 18) - प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत महाराष्ट्रात खरीप हंगाम - 2024 साठी पीक विमा भरण्याची सुरुवात आजपासून शासनाच्या https://www.pmfby.gov.in या पोर्टलद्वारे करण्यात आली असून, याही वर्षी शेतकऱ्यांना आपल्या अधिसूचित पिकांचा विमा भरण्यासाठी केवळ 1 रुपया भरावा लागणार असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज दिली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून मागील वर्षी विक्रमी 1 कोटी 70 लक्ष पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आपला पीकविमा भरून या योजनेत सहभाग घेतला होता. खरीप 2024 साठी भात, ज्वारी, सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, नाचणी, भुईमूग, तीळ, कारळे, कांदा ही 14 पिके विमा योजनेत समाविष्ट करण्यात आली आहेत. तर या पिकांचा विमा भरण्याची अंतिम मुदत 15 जुलै असून, त्यापूर्वी शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा विमा भरून घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे. योजनेतील वैशिष्ट पूर्ण बाबी : विमा योजनेत समाविष्ट पिके भात(धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी(रागी), मका, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमुग, तीळ, कारळे, कापूस व कांदा या १४ पिकांसाठी ,अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना भाग घेता येईल. अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके घेणारे (कूळाने अगर भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसह) सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. पीक कर्ज घेणाऱ्या आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक राहील, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पिक विमा पोर्टल वर नोंदणीकृत भाडे करार अपलोड करणे आवश्यक आहे.

ई-पीक पाहणी :- शेतकऱ्याने लागवड केलेल्या पिकाची नोंद ई-पीक पाहणी मध्ये करावी.आपल्या मालकीच्या नसलेल्या जमिनीवर विमा काढणे , उदाहरणार्थ शासकीय जमीन, अकृषक जमीन, कंपनी, संस्था, मंदिर, मस्जिद यांची जमीन वर विमा काढल्यास त्याची अत्यंत गंभीर दखल घेतली जाईल.

या योजनेत आपण जे पीक शेतात लावले आहे त्याचाच विमा घ्यावा. शेतात विमा घेतलेले पीक नसेल तर आपणास विमा नुकसान भरपाई पासून वंचित राहावे लागेल.या वर्षी भात, कापूस, सोयाबीन पिकांमध्ये महसूल मंडल मधील पिकाचे सरासरी उत्पादन नोंदवताना रीमोट सेसिंग तंत्रज्ञान चा वापर करून येणाऱ्या उत्पादनास ४० टक्के भारांकन आणि पीक



कापणी प्रयोग द्वारे आलेल्या उत्पादनास ६० % भारांकन देऊन मंडळाचे सरासरी उत्पादन निश्चित केले जाणार आहे.

अर्ज करण्यासाठी आधार क्रमांक आवश्यक आहे, पिक विम्यातील अर्ज हा आधार वरील नावाप्रमाणेच असावा, पिक विम्यातील नुकसान भरपाई ही केंद्र शासनाच्या विमा पोर्टल द्वारे आधार संलग्न बँक खात्यामध्ये करण्यात येते. यासाठी आपले बँक खाते आधार संलग्न पेमेंट मिळण्यासाठी अधिकृत असणे आवश्यक आहे. याकरिता आपले बँक मॅनेजर माहिती देऊ शकतात , आधार कार्ड वरील नाव व बँक खात्यावरील नाव सारखे असावे, विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी विभागास रुपये ४० मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिलेले आहे. ते संबंधित विमा कंपनी मार्फत सीएससी विभागास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रति अर्ज एक रुपया प्रमाणे रक्कम सीएससी चालकांना देणे अभिप्रेत आहे. विमा संरक्षणाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत : पिक पेरणीपासून काढणी पर्यंतच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट, पिक पेरणीपूर्व /लावणीपूर्व नुकसान, हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे नुकसान, काढणी पश्चात पिकाचे नुकसान, स्थानिक नैसर्गिक आपत्ती मुळे नुकसान. विमा योजनेत सहभागी होण्याकरिता शेतक-याने काय करावे? अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पिक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांस देखील या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. मात्र त्या साठी शेतकऱ्याने विमा योजना भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान ७ दिवस संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळवणे गरजेचे आहे. इतर बिगर कर्जदार शेतक-याने आपला ७/१२ चा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड व पिक पेरणीचे स्वयं घोषणापत्र घेवून प्राधिकृत बँकेत किंवा कॉमन सर्विस सेंटर (CSC) च्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता. योजनेत सहभागासाठी अंतीम मुदत दि. १५ जुलै २०२४ आहे.

सर्वसाधारण पिक निहाय विमा संरक्षित रक्कम, यात जिल्हानिहाय फरक संभवतो. भात पिकासाठी विमा संरक्षित रक्कम हेक्टरी रु.४०००० ते ५१७६०, ज्वारी रु.२०००० ते ३२५००, बाजरी रु १८,००० ते ३३,९१३, नाचणी रु. १३७५० ते २००००, मका रु ६००० ते ३५५९८, तूर रु २५००० ते ३६८०२, मुग २०००० ते २५८१७, उडीद रु. २०००० ते २६०२५, भुईमुग रु. २९००० ते ४२९७१, सोयाबीन रु. ३१२५० ते ५७२६७, तीळ रु. २२००० ते २५०००, कारळे रु. १३७५०, कापूस रु. २३००० ते ५९९८३, कांदा रु. ४६००० ते ८१४२२. या योजनेच्या अधिक माहितीसाठी केंद्र शासनाचे कृषि रक्षक पोर्टल हेल्पलाईन १४४४७, संबंधित विमा कंपनी, स्थानिक कृषि विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

# धनेगाव येथील केव्ही उपकेंद्रात ५ एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मरचे आ. नमिता मुंदडा यांनी केले लोकार्पण

१२ गावातील हजारो वीज ग्राहकांना होणार अखंडीत वीज पुरवठा अंबाजोगाई धनेगाव येथील ३३ केव्ही उपकेंद्र अंतर्गत ५ MVA अतिरिक्त पावर ट्रासफार्मरचे उदघाटन आ. नमिता अक्षय मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नंदकिशोर मुंदडा व इतर मान्यवरांची उपस्थिती होती यावेळी बोलताना आ. नमिता मुंदडा म्हणाल्या की, ३३ केव्ही उपकेंद्र ओव्हरलोड झाल्याने उपकेंद्र अंतर्गत गावातील गावठाण व शेतीचा विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत होता. ५ एमव्हीए अतिरिक्त पावर ट्रान्सफॉर्मर सुरू झाल्याने गावठाण व शेतीचा विद्युतपुरवठा सुयोग्य दाबाने होणार आहे धनेगाव सबस्टेशन परिसरातील १० ते १२ गावांमधील शेतकऱ्यांकडून सुरळित वीजपुरवठा होण्यासाठी सातत्याने मागण्या येत होत्या या अनुषंगाने आ. नमिता मुंदडा यांनी राज्य शासनाकडे रोहित्र मंजूर करण्यासाठी पाठपुरावा करून ते मंजूर करून घेतले होते. या ५ एमव्हीए क्षमतेचे नवीन अतिरिक्त रोहित्राचे लोकार्पण आज करण्यात आले या नवीन रोहित्रामुळे धनेगाव सबस्टेश परिसरातील १० ते १२ गावांना उच्च दाबाने व अखंडित वीजपुरवठा होणार असल्यामुळे याचा हजारो शेतकऱ्यांना व घरगुती ग्राहकांना लाभ होणार आहे तसेच केज मतदारसंघात आरडीएसएस योजनेअंतर्गत केज मतदारसंघात १४ नवीन ३३ केव्ही उपकेंद्र व १५ जुन्या ३३ केव्ही उपकेंद्रात आतिरिक्त ५ एमव्ही पॉवर ट्रान्सफार्मर व ६०० नवीन ट्रान्सफॉर्मरचा प्रस्ताव शासनास पाठवला आहे तसेच मुख्यमंत्री सौर योजनेत केज मतदारसंघात १० ठिकाणी सौर पॉवर प्लांट मंजूर आहेत त्याचे कामे लवकरच सुरु होणार आहेत, त्यानंतर त्या १० ठिकाणी अतिरिक्त ५ एमव्ही पॉवर ट्रान्सफॉर्मर बसवण्यात येणार आहेत. त्यामुळे सदरील ३३ केव्ही उपकेंद्राअंतर्गत शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार आहे. राहिलेल्या ३३ केव्ही उपकेंद्रातही मुख्यमंत्री सौर योजना होणार असल्याचे ही आ. नमिता मुंदडा यांनी सांगितले या कार्यक्रमास जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा महावितरणचे उप कार्यकारी अभियंता देशपांडे, जाधव साहेब सहाय्यक अभियंता यु. वडगाव, पंचक्रोशीतील उपस्थित सर्व शेतकरी बांधव, प्रमुख पदाधिकारी व मान्यवर यांच्यासह महावितरणचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

## पावसापासून संरक्षणासाठी सुगरणीची घरटी सज्ज



ऊन, वारा, पाऊस, यापासून आपल्या जीवाचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाला एका घराची आवश्यकता असते त्याच पद्धतीने सुगरण पक्षी पावसाळ्यापूर्वी आपले घरटी बनवून आपले व आपल्या पिलांचे संरक्षण करण्यासाठी सज्ज झाला आहे. जिकडे तिकडे म्हणजेच विहीर, नदी, नाले,येथील झाडावरती सुगरणीची घरटी लटकताना दिसत आहेत.

जीवन जगताना प्रत्येकाला एका निवाऱ्याची गरज असते. त्या पद्धतीने प्रत्येक जण आपले घर बनवत असतो. निसर्गात आढळणारा एक छोटासा सुगरण पक्षी पावसाळ्याच्या तोंडावर घरटी बनवून तो ऊन, वारा, पाऊस, यांच्यापासून बचाव करण्यासाठी आपली घरटी सज्ज ठेवली आहेत. विशेषता जिथे अन्न, कीटक, आणि पाण्याची मुबलक व्यवस्था आहे. अशा ठिकाणीच हा सुगरण पक्षी आपली घरटी बनवत असतो. या घरट्यांची कलाकुसर पाहिली तर मात्र एखाद्या इंजीनियरला सुद्धा लाजवेल असे त्यांचे घरटे असते. या घरट्यात सुगरण आपल्या पिलांचे व आपले संरक्षण करते.कलाकुसर करून बनवलेली घरटे मात्र सर्वांच्याच लक्ष वेधून घेतात. ही घरटी एवढी मजबूत असतात की, त्यामध्ये पावसाचे पाणी देखील घरट्यात येऊ शकत नाही.

झाडांना लटकणारी घरटी मात्र सर्वांचेच लक्ष वेधत आहेत. अशी घरटी पावसाचा प्रतिकार करण्यासाठी तयार झाली आहे.

# भक्ताच्या भक्तीने देव ऋणी होतो शिवाजी महाराज नारायणगडकर यांचे प्रतिपादन...

बीड प्रतिनिधी - भक्ताच्या भक्तीने देव ऋणी कसा होतो. जन्मोजन्मी भगवंतास जिवलग, सखा बनवण्यासाठी संतसंघ कसा अवघड आहे. साधूची सेवा केल्याने सदभक्तास भगवंताची पितांबर रुपी छाया कशी लाभते. वाल्यास पश्चाताप का झाला. असे संत साहित्याचे विविध दाखले देऊन विषदित केले. श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महानसंत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या चोविसाव्या ( द्वितपपूर्ती ) पुण्यतिथी उत्सवात चतुर्थ दिवसाचे कीर्तन पुष्प गुंफताना महाराज बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर, श्री ह भ प नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, मृदंग महामेरू राम महाराज काजळे,श्री ह भ प नाना महाराज कदम, ह भ प सिद्धेश्वर महाराज बागलाने, नानासाहेब काकडे पाटील, सरपंच विनोद कवडे यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती. श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या 24 व्या ( द्वितपपूर्ती )




पुण्यतिथी सोहळ्यात चतुर्थ दिवसाचे कीर्तन पुष्प गुंपताना महंत प्रेम मूर्ती ह भ प शिवाजी महाराज नारायण गडकर यांनी संत नामदेवराय यांच्या संतापायीं माथां धरितां सद्भावें । तेणें भेटे देव आपेंआप ॥१॥ म्हणवूनि संतां अखंड भजावें । तेणें भेटे देव आपेंआप ॥२॥ साधुपाशीं देव कामधंदा करी । पीतांबर धरी वरी छाया ॥३॥ नामा म्हणे देव इच्छी संतसंग । आम्हां जिवलग जन्मोजन्मीं ॥४॥ यां अभंगावर सुंदर चिंतन मांडले. दादा माऊलींचे जीवन हे परमार्थिक साधकांसाठी आदर्श होते. किर्तन भजनातून ज्ञानदान आणि अन्नदानाच्या माध्यमातून लोकांना तृप्त केलें. दादा माऊलींचे नामस्मरणावरती खुप मोठे प्रेम होते.यावे कीर्तनासाठी साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंगाचार्य राम महाराज काजळे, श्री ह भ प, श्री ह भ प हरीकिसन देवकर श्री ह भ प संजय देवकर श्री ह भ प ज्ञानेश्वर माऊली आवटे ,श्री ह भ प बिभीषण महाराज कोकटे, अभिमान महाराज ढाकणे यांच्यासह माऊली फडावरील सर्व महाराष्ट्रातील नामांकित गायक वादक मंडळींची उपस्थिती होती.

## लक्ष्मण हाकेंच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी शिरूर कासार येथे साखळी आंदोलन

शिरूर कासार/प्रतिनिधी

ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लावण्यात येवू नये या मागणीसाठी वडीगोद्री येथे आमरण उपोषणाला बसलेल्या लक्ष्मण हाके यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी शिरूर कासारयेथे साखळी आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.या संदर्भात 20 जून,गुरुवार रोजी सकाळी साडेनऊ वाजता शहरातील श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थानच्या सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सकल ओबीसी समाजाच्या वतीने देण्यात आली आहे.या बैठकीला तालुक्यातील अठरापगड जातीच्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन देखील करण्यात आली आहे.या बैठकीत



लक्ष्मण हाके यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासह मराठा समाजाला कोणत्याही परिस्थितीत ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यात येवू नये या आणि इतर मागण्यांसंदर्भात चर्चा करून आगामी आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यात येणार असल्याचे देखील शिरूर कासार तालुका सकल ओबीसी समाजाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## लोहा येथील क्रांतिसूर्य बुद्ध विहाराला सुधाकर पाटील पवार यांनी दिले समेटाचे आसन भेट

लोहा/प्रतिनिधी

लोहा नगरीचे शिल्पकार तथा लोहा नगर परिषदचे प्रथम नगराध्यक्ष कै. माणिकराव पाटील पवार यांच्या स्मरणार्थ त्यांचे नातू सामाजिक कार्यकर्ते सुधाकर पाटील पवार यांनी लोहा येथील क्रांतिसूर्य बुद्ध विहाराला सिमेंट चे ४ आसन भेट दिल्यामुळे नागरिकांना आसन व्यवस्था झाली आहे.

सामाजिक,शैक्षणिक धार्मिक , आरोग्य विषयक आदी कार्यात सदा अग्रेसर असणारे लोहा नगरीचे शिल्पकार तथा प्रथम नगराध्यक्ष कै. माणिकराव पाटील पवार यांचे नातू सुधाकर पाटील पवार




हे नेहमीच विविध सामाजिक , शैक्षणिक , आदी उपक्रम राबवितात . याचाच एक भाग म्हणून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न परमपूज्य बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त लोहा नगरीचे शिल्पकार तथा प्रथम नगराध्यक्ष कै. कै.माणिकराव पाटील पवार यांच्या स्मरणार्थ चार सिमेंटचे आसन खुर्ची भेट दिले. या असनाचा लाभ अनेक नागरिक घेत आहेत.

यावेळी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते गंगाधरराव महाबळे, पप्पू वारकरे, मिडिया पोलिस सोशल क्लब पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष विलास सावळे,विनोद महाबळे , भैय्यासाहेब येवले यांनी या आसनावर बसून समाधान व्यक्त

# तीर्थक्षेत्र मंजूर निधी मागण्यांसाठी आमरणउपोषण सुरू ! जोपर्यंत तीर्थक्षेत्र निधी मागण्यांपुर्ण होत नाही उपोषण सुरुच-रोहन गलांडे

केज/ प्रतिनिधी

केज तालुक्यात चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज मंदिरासाठी तीर्थक्षेत्रासाठी ५० लाख रुपये निधी मंजूर झालेला असुन सुद्धा निधीचे वितरण केले जात नाही व मंदीराच्या विकास कामास सुरवात केली जात नाही तरी निधीचे वितरण करुन मंजूर निधीच्या मागण्यांसाठी श्री संत नामदेव महाराज तीर्थ क्षेत्राचे काम तात्काळ सुरु करण्यात यावे यासाठी अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील दि.१७ /०६/२०२४ रोजी वेळ सायंकाळी ६ वाजता आमरण उपोषणास बसले आहेत या विषय सविस्तर वृत्त असे की केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील तीर्थक्षेत्र विकास कामांसाठी श्री संत नामदेव महाराज मंदिर चिंचोली माळी ता.केज जि.बीड तीर्थक्षेत्रासाठी ५० लाख निधी मंजूर झालेला असुन अनेक दिवसांपासून निधीचे वितरण करण्यस विलंब होत आहे व मंजूर निधीचे वितरण व्यवस्थेत होवून निधी खर्च करण्यात यावा या मागणीसाठी रोहन गलांडे पाटील श्री संत नामदेव महाराज सभागृह येथे आमरण उपोषणाला बसले आहेत तरी रोहन गलांडे यांच्या मागण्या अशा आहेत की श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाचा मंजूर निधी श्री संत




नामदेव महाराज तीर्थक्षेत्रा साठीच खर्च करण्यात यावा, तीर्थक्षेत्राचे काम पूर्ण होईपर्यंत गावकऱ्यांची ऐक समीती असेल, तीर्थक्षेत्राचे काम निकृष्ट दर्जाचे होऊ नये याला जबाबदार काम करणारा गुत्तेदार जबाबदार राहील, तीर्थक्षेत्राचे काम पूर्ण झाल्यानंतर गावकऱ्यांना खर्च झालेल्या निधीची माहिती देण्यात यावी.अशा मागण्या असुन रोहन गलांडे यांनी म्हटले आहे की चिंचोली माळी गावचा नागरीक म्हणून माझ्या एवढ्या मागण्या प्रशासनाला मान्य असतील तर मी माझ्या श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र निधी ५० लाख निधी साठी सुरु केलेल्या आमरण उपोषणाला तीर्थक्षेत्राचे काम पूर्ण होईपर्यंत स्थगिती देणार आहे जर तीर्थ क्षेत्राच्या कामात काही त्रुटी शंका कुशंका वाटली , अडथळा आला तर मी परत उपोषणाला सुरवात करणार उपोषना दरम्यान मला जर काही झाले तर सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई,केज व प्रशासन जबाबदार राहील असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग केज, अंबाजोगाई यांचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष कशामुळे करत आहे सर्वाजनिक बांधकाम विभागाचे गोडबंगाल काय श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास मंजूर निधीच्या उपलब्धतेनुसार मागण्या मंजूर करण्यास अडचण काय उपोषणा दरम्यान मला जर काही झाले तर सर्वस्व जबाबदार प्रशासनान असेल - रोहन गलांडे पाटील

# सायरा समीर म्हात्रे शैक्षणिक सामाजिक संस्था, कळंबुसरे मार्फत अनाथ मुलांना मोफत वह्या पुस्तके वाटप.

उरण/प्रतिनिधी

समाजातील अनाथ, गोर-गरिब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत मिळावी हे उद्दिष्ट डोळ्यासमोर समीर शंकर म्हात्रे, कळंबुसरे यांनी स्थापन केलेल्या सायरा समीर म्हात्रे शैक्षणिक सामाजिक संस्था, कळंबुसरे या संस्थेमार्फत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. त्यातील राबविण्यात आलेले एक स्तुत्य उपक्रम म्हणजे "अनाथ मुलांना मोफत वह्या पुस्तके वाटप अभियान". या उपक्रमाअंतर्गत कौस्तुभ संतोष पाटील (मोठीजुई), वेदांती रविंद्र पवार (टाऊनशिप), उन्मेक्षा मनोज ठाकूर (वशेणी), नितिक मनोज ठाकूर (वशेणी), भाविका वासुदेव पाटील (दादर, पेण), भावेश वासुदेव पाटील (दादर, पेण), भुमिका चव्हाण



(बालई, उरण), श्रेयस चव्हाण (बालई, उरण), आस्था जैन (उरण), पालक जैन (उरण), निदिता करवडकर (मोरा, उरण), हरदिप करवडकर (मोरा, उरण), मनिषा सुरेश कोरेकर (गणेश नगर, उरण) अशा १ ली ते पदवी पर्यंतच्या अनेक मुलांना मोफत वह्या-पुस्तके वाटप करण्यात आली. या स्तुत्य अशा उपक्रमासाठी संस्थेचे सल्लागार विठ्ठल ममताबादे, कार्याध्यक्ष पद्माकर पाटील, सदस्या ॲड.रेश्मा धुळे, संस्थापक अध्यक्ष समीर म्हात्रे यांनी मोलाचे सहकार्य केले.

## संजय शिरसाट राऊतांवर संतापले, म्हणाले, 'लांडग्याचे कातडं पांघरलं;

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला आहे. "संजय राऊतांच्या टीकेला अर्थ नाही. मुर्खासारखे त्यांचे स्टेटमेंट आहेत. शिवसेना पक्षप्रमुखाचे विचार यांनी सोडले. त्यांना जे आवडतं नव्हते ते आचरणात आणलं, आता ज्ञान पाजळत आहेत. आम्ही गोधडीत होतो पण तुम्ही त्या स्टेजवर होता का? डोममध्ये घेतलेला कार्यक्रम पाऊस, पाणी पाहून घेतलाय. तुमची सर्व कामे आम्ही करत आहोत. याच डोममध्ये तुमच्या विरोधात राहुल नार्वेकर यांनी तुमच्या विरोधात निर्णय दिला तेव्हा हे डोम कावळे काय करत होते? संजय राऊत यांनीच लांडग्याचे कातडं पांघरलं आहे. कातडं आमच्यावर नाही तुमच्यावर आहे. कातडं पांघरुन तुम्ही शरद पवार आणि राहूल गांधी यांच्या पायाशी जाऊन बसले", असा घणाघात संजय शिरसाट यांनी केला.

# छगन भुजबळांची पक्षात गळचेपी होतेय, ते नक्की निर्णय घेतील; जितेंद्र आव्हाडचा दावा?

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ हे मागच्या काही दिवसांपासून नाराज असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. यावर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया दिली आहे. छगन भुजबळांची पक्षात गळचेपी होतेय, हे कुणीही नाकारू शकत नाही. ते अनेक पदांचे मानकरी होऊ शकले असते. पण त्याबद्दल मला आता बोलायचं नाही. छगन भुजबळ यांच्याबद्दल माझ्या मनात आदर आहे. तो कायम राहणार आहे. त्यांना जर घुसमटल्यासारख वाटतं असेल तर ते नक्की निर्णय घेतील, असं जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे. मराठा समाजाला आरक्षण देत असतानाच ओबीसींच्या आंदोलनाला धक्का लागू नये, अशी ओबीसी समाजाची इच्छा आहे. यासाठी उपोषण केलं जात आहे. ओबीसी समाजाच्या आंदोलनावर आव्हाडांनी प्रतिक्रिया दिलीय. आंदोलन करणाऱ्या ओबीसी नेत्यांनी सांगितलंय की, आम्ही काय मुंबईला येऊन मुख्यमंत्र्यांना भेटणार नाही. तुम्ही इकडे या, असं आव्हाड म्हणाले. निकालावरच्या वादावर प्रतिक्रिया मुंबई उत्तर- पश्चिम लोकसभा मतदारसंघातील निकालावरून सध्या वाद सुरु आहे. यावर अमोल किर्तीकर पराभूत झालेले नाहीत. त्यांना पराभूत करण्यात आलेलं आहे. आरओ असणाऱ्या सूर्यवंशी मॅडम आहेत. त्यांचे लागेबांधे कोणाकोणाशी आहेत हे मला माहिती आहे. आरओकडूनच सिद्ध झालाय एव्हीएम मॅनेज होतं, असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.



## पटोलेंच्या व्हायरल व्हीडिओवर प्रतिक्रिया

एका कार्यकर्त्याने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे पाय धुतल्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे. यावर जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया दिली आहे. कार्यकर्ते कधी कधी प्रेमापोटी वागतात. कुठल्या गोष्टींचे राजकारण करायचं कुठल्या नाही, हे कळायला हवं. नानांचे पाय धुवून हळद कुंकू लावून कोणी नारळ तर फोडला नाहीये ना... मग जाऊ देत. अजितदादांना टार्गेट केल जातंय. एखाद्या नेत्याला घेरून टीका करायची हे योग्य नाही. आमच्या आता विचारधारा वेगळ्या आहेत. पण तिथे त्यांना टार्गेट केलं जातंय हे खरंय, असं जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे.

# गेवराई येथे दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची संधी ; प्रवेश प्रक्रिया सुरु

### दिव्यांग शाळेत मुकबधीर व मतिमंद बालकांचा आजच प्रवेश निश्चित करा

**गेवराई/प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिव्यांग कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद बीड व रेणुकामाता सेवाभावी संस्था महाडुंळा संचलित कै.भगवानराव ढोबळे मुकबधिर निवासी विदयालय व मतिमंद निवासी विदयालय गेवराई येथील निवासी शाळेत सन-२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी मुकबधिर व मतिमंद या प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. तरि पालकांनी यांची नोंद घेऊन आपल्या पाल्याचा मोफत प्रवेश निश्चित करावा असे दिव्यांग शाळेच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

गेवराई येथील कै.भगवानराव ढोबळे मुकबधिर निवासी विदयालय व मतिमंद निवासी विदयालय गेवराई येथे सन-२०२४- २५ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे.



प्रवेशासाठी मुकबधिर, मतिमंद या प्रवर्गातील मुलांचे वय ६ ते १४ वर्ष वयोगटातील असावे तसेच मुलगा मतिमंद व मुकबधिर असावा दिव्यांगत्व असल्याबाबतचे वैद्यकीय अधिकाऱ्याचे ऑनलाइन प्रमाणपत्र असावे वरीलपैकी दिव्यांगत्व असल्यास व त्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र काढले नसल्यास प्रमाणपत्र काढण्यासाठी शाळेकडून मदत केली जाते. प्रवेशीत दिव्यांग विद्यार्थांना वस्तीगृहात अंघोळीसाठी गरम पाणी, सकाळी नाष्टा, दुपारी जेवण, संध्याकाळी जेवण, राहण्यासाठी भव्य इमारत झोपण्यासाठी सुसज्ज हॉल व शिक्षणासाठी वर्गखोल्या व शैक्षणिक साहित्य तसेच वैद्यकिय उपचार इत्यादी सेवा विनामूल्य आहेत. तरि आपला पाल्य किंवा नातेवाईक जर मुकबधिर, मतिमंद असतील तर त्याचा आजच प्रवेश निश्चित करावा. विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज कार्यालयीन वेळेत दि.१५ जुन पासुन विनामूल्य आहेत. तरी मुकबधीर, मतिमंद या प्रवर्गातील मुलांच्या पालकांनी लवकरात लवकर आपल्या पाल्याचे कागदपत्रे सादर करुन मुलाचा प्रवेश निश्चित करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## मराठे OBC तूनच आरक्षण घेणार, ते ही 50 टक्क्याच्या आत, मनोज जरांगेंनी ठणकावलं



"आम्ही सांगितलेल्या व्याख्येप्रमाणेच सग्या सोयऱ्याची अमलबजावणी व्हावी. सगळे गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया 13 जुलै आधी करावी. शिंदे समितीला एक वर्ष मुदतवाढ द्यावी. बॉम्बे गर्व्हमेन्ट गॅजेट, सातारा गर्व्हमेन्ट गॅजेट, जे आमचे ठरलेले विषय, मागण्या आहेत, त्या पूर्ण कराव्यात" असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. "13 जुलैच्या आधी मराठ्यांना ओबीसीच्या अंतर्गत तेही 50 टक्क्याच्या आत आरक्षण मिळालं पाहिजे" असं मनोज जरांगे पाटील ठामपणे म्हणाले. कॅबिनेटमध्ये तुमच्या मागण्यांवर चर्चा होणार होती. पण ओबीसी आंदोलन सुरु झालं. त्यांनाही सरकारने कॅबिनेटमध्ये चर्चा करणार म्हणून शब्द दिलेला. मराठा-ओबीसीच्या चर्चेत वादळ नको, म्हणून कॅबिनेट कॅन्सल केली का? या प्रश्नावर मनोज जरांगे पाटील म्हणाले की, "कॅबिनेट रद्द करण्याच कारण मला माहित नाही. त्यांचे काही प्रॉब्लेम असतील, मला माहित नाही

# पुण्यात ओबीसी संघटनांचं आंदोलन, थेट सगेसोयरे जीआरची होळी




ओबीसी संघटनांचे कार्यकर्ते गेल्या आठवड्याभरापासून उपोषणाला बसले आहेत. या उपोषणस्थळीच ओबीसी संघटनांच्या कार्यकर्त्यांकडून सगेसोयरे जीआरची होळी करण्यात आली आहे. तर सगेसोयऱ्यांच्या कायद्याची अंमलबजावणी करू नका, अशी मागणी देखील ओबीसी संघटनांच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आली. पुणे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात ओबीसी संघटनांचे कार्यकर्ते गेल्या आठवड्याभरापासून उपोषणाला बसले आहेत. या उपोषणस्थळीच ओबीसी संघटनांच्या कार्यकर्त्यांकडून सगेसोयरे जीआरची होळी करण्यात आली आहे. तर सगेसोयऱ्यांच्या कायद्याची अंमलबजावणी करू नका, या पद्धतीची मागणी पुण्यात ओबीसी संघटनांच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. 'सगेसोयरे हा शब्दच आपल्या संविधानामध्ये नाही. सगेसोयरे हे नातं आपल्या वडिलांकडून आलेलं आहे. पण त्याचा जर मनोज जरांगे पाटील यांचा अभ्यासच नाही आणि ते सगेसोयरे हेच धरून बसले आहेत. सातत्याने आंदोलन करणाऱ्या जरांगे पाटील यांच्यापुढे राज्यसरकार झुकणार असेल तर मग सरकारला आणखी बरंच शिकण्याची गरज असेल. सरकारचा या संदर्भात आम्ही निषेध करतोय त्यासाठी आम्ही प्रतिकात्मक होळी केली आहे', अशी भावना ओबीसी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

# करियरचा विचार करताना युवकांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडावे-आमदार नमितताई मुंदडा

## छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिरामध्ये मार्गदर्शन शिबिर संपन्न...

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

माझे वडील अभियंते असल्यामुळे घरामध्ये सर्वांचीच इच्छा होती की मीही अभियंता व्हावे परंतु मला मात्र माझ्या आवडीच्या क्षेत्रामध्ये काम करायचं होत. त्यामुळे मी आर्किटेक्ट व्हायचा निर्णय घेतला. युवकांनी आपल्या करिअरचा विचार करत असताना स्वतःला आवडणाऱ्या क्षेत्रांमध्ये करिअर करावे असा सल्ला आ.नमितताई मुंदडा यांनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई व केज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिरामध्ये युवक युवतींना दिला. कार्यक्रमाचे प्रारंभी कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्य तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई व केजच्या वतीने युवकांसाठी करियर शिबिरा निमित्त पोस्टर प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. या प्रदर्शनीचे उद्घाटन आ.नमितताई मुंदडा यांच्या हस्ते संपन्न झाले. व्यासपीठावर राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून युवाशक्ती करिअर शिबिराला प्रारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी पी.जे. औताडे होते, तर शिबिर उद्घाटन प्रसंगी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई व केज यांच्या वतीने



प्राचार्य पी.टी.मुने व प्राचार्य के.जे. पवार यांनी सर्व अतिथींचे स्वागत केले. या शिबिराच्या निमित्ताने इयत्ता दहावी बारावीनंतर शिक्षणाच्या विविध संधी या विषयावर डॉ.रघुनाथ जोगदंड, व्यक्तिमत्व विकास या विषयावर ब्रिलियंट अकॅडमीचे संचालक प्राध्यापक हनुमंत भोसले, यांनी तर यशस्वी उद्योजक होण्याचा मंत्र शैक्षणिक व रोजगार कर्ज योजना या विषयावर करियर मार्गदर्शक ॲड.संदीप थोरात, झिरो मेडिटेशन या विषयावर स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रशांत दहिरे तसेच समाज प्रबोधन या विषयावर सामाजिक कार्यकर्ते विकास पाथरीकर यांनी युवक युवतींना उत्तम मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अवताडे सर यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील करिअरच्या संधी उपलब्ध होणार असून याचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नावीन्यता विभाग महाराष्ट्र राज्य तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई व केज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराच्या आयोजनासाठी शिंपले सर लोमटे सर,वैरागे सर, बर्गे सर, निलेश सर, मैत्री सर, होळीकर सर, शिंदे सर, वाघमारे सर, श्रीमती खिल्लारे मॅडम, श्रीमती देशपांडे मॅडम, साबळे सर, पोटपल्लेवार सर त्याचप्रमाणे समस्त कर्मचारी व शिल्प निदेशक यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश बोरगावकर यांनी केले तर आभार प्राचार्य पवार सर यांनी मांनले.

दैनिक वादळ वार्ताहे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनूडिजिटल छापन संप ादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 के ज येथन तू यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित के ले आहे ( वाद के ज / बीड न्यायालय अंतर्गत )